विधान भवन उपाहारगृहामार्फत बाहेरील
खाद्यपदार्थांचा पुरवठा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे)
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३९०/१७/मंउका,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २६ एप्रिल, २०१८

शासन परिपत्रक :-

विधानमंडळ सचिवालयातील मा. सभापती, मा. उपसभापती, मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. विरोधी पक्षनेते यांची कार्यालये तसेच त्यांच्याकडे होणाऱ्या बैठका, विधानमंडळाच्या अखत्यारित असलेल्या विविध समित्या यांचेकडील होणाऱ्या बैठका तसेच विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी तथा कर्मचारी यांना विधानभवन येथील दुसऱ्या मजल्यावरील उपाहारगृहामार्फत भोजन, चहा, नाश्ता आणि थंडपेय इत्यादीची सेवा पुरविण्यात येते.

२. तसेच मा. सभापती, मा. अध्यक्ष यांचेकडे होणाऱ्या अतिमहत्त्वाच्या तसेच विदेशी पाहुण्यांसोबत होणाऱ्या बैठकांसाठी त्यांनी उपाहारगृहात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थां व्यतिरिक्त बाहेरील खाद्यपदार्थांची मागणी केल्यास ते खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देण्यासाठी रु.३२,०००/- इतका स्थायी अग्रीम (Permanent Advance) मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि विधानमंडळ सचिवालयात विविध समित्यांच्या होणाऱ्या बैठकांसाठी विधान भवन उपाहारगृहात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांव्यतिरिक्त बाहेरील खाद्यपदार्थांची मागणी मोठया प्रमाणात होत असल्याने मा. सभापती तथा मा. अध्यक्ष यांचेकडे होणाऱ्या बैठकांसाठी उपाहारगृहाकडे उपलब्ध असलेल्या स्थायी अग्रिमामधून त्यांनी मागणी केलेले खाद्यपदार्थ वेळोवेळी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ बैठकीच्या वेळी उपाहारगृहामार्फत बाहेरील खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देण्यात येतात, त्याप्रमाणे मा.सभापती व मा.अध्यक्ष महोदय यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठका तसेच परदेशी पाहूण्यांच्या शिष्टमंडळासोबत होणाऱ्या बैठकांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बैठकांसाठी विधान भवन उपाहारगृहात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांव्यतिरिक्त अन्य कोणतेही बाहेरील खाद्यपदार्थ उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०४२६१७१८२११२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2018.04.26 17:22:22 +05'30'

(इ. मु. काझी)
सह सचिव (उपाहारगृहे)

प्रत,

१) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. उप सभापती , विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उपाध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
८) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९) मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, यांचे वरिष्ठ स्विय सहायक, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
११) अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१३) वरिष्ठ व्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृहे,
१४) सहा. लेखा अधिकारी, विधान भवन उपाहारगृह,
१५) व्यवस्थापक, विधान भवन उपाहारगृह,
१६) निवड नस्ती.